जा.क्र.प्राअवि/एनसीटीई/२००६-०७/३४-ट/४८०८२
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, पुणे ३०
दिनांक : १४-११-२००६

प्रति,

प्राचार्य,
आयडियल कॉलेज ऑफ एज्युकेशन
वासर मंगल रोड ग्रा. अंबरनाथ जि. ठाणे

विषय :- सन २००६-०७ या वर्षाकरिता नवीन अध्यापक विदयालयास मान्यतेबाबत...

संदर्भ :- १) एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. डब्ल्यूआरसी/
दिनांक २८/८/०६/३०/१०/०६/२८/१०/०६/१०/११/०६
२) शासन पत्र दिनांक १८/१०/०६
३) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे तपासणी / पडताळणी आदेश दिनांक १८-१०-२००६

एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेत नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तींच्या अधीन राहून सन २००६-०७ पासून नवीन अध्यापक विद्यालयास/अतिरिक्त तुकडीस परवानगी देण्यात आलेली आहे. अटी व शर्ती पुढीलप्रमाणे असतील त्यांचे काटेकोरपणे पालन अ.वि. च्या व्यवस्थापनाने करावे, त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१) एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२) विहित अर्हताधारक व अनुभवी प्राचार्य व अध्यापक यांची महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार व खाजगी शाळा सेवा शर्ती १९८१ च्या नियमावलीनुसार नेमणूक केली.

३) नेमलेल्या सर्व सेवकांना विभागीय उपसंचालक यांची मान्यता घेण्यात यावी.

४) प्रवेशाच्यावेळी प्रचलित शासन धोरणानुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रवेश करण्यात येईल.

५) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन घेतले जावे. त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) डी.एड. विनियमन प्रधिकरण, पुणे (द्वारा - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०) यांचेकडून ३० डिसेंबर २००६ पूर्वी शुल्क निश्चित बाबतचा प्रस्ताव ~~दाखविलेला नाही~~ दाखल करावा.

७) नियमाप्रमाणे अनुज्ञेय व्यवस्थापनाच्या जागा भरण्यास आपणास परवानगी देण्यात येत आहे. व्यवस्थापनाच्या जागा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) व्यवस्थापन कोटा भरताना कोणतेही शासकीय नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. व्यवस्थापन अगर शासकीय कोटयातील प्रवेश देताना कोणाही उमेदवारांकडून डोनेशन घेतले जाणार नाही किंवा अन्य कोणतीही तक्रार येणार नाही याची काळजी घेतली जावी. याबाबत कोणतीही तक्रार आल्यास महाराष्ट्र कॅ.फी ॲक्ट १९८७ मधील कलमांच्या तरतुदीनूसार संबंधित अ.वि./व्यवस्थापनावर कारवाई केली जाईल.

९) दरवर्षी एन.सी.टी.ई. ला स्टाफ प्रोफाईल विहित नमुन्यात संचालकांच्या प्रतिस्वाक्षरीसाठी सादर केली जावी.

१०) महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य इ. बाबींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल.

११) चालू शैक्षणिक वर्ष २००६-०७ मध्ये एन.सी.टी.ई. ने आपल्या अध्यापक विद्यालयास / वाढीव तुकडीस अत्यंत विलंबाने म्हणजेच विभागस्तर आणि राज्यस्तर केंद्रीय प्रवेश प्रक्रिया चालू असताना / संपल्यावर मान्यता कळविलेली असल्याने आपला अध्यापक विद्यालयात केंद्रीय प्रवेश विभाग स्तर व राज्यस्तरावरून करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया शुल्क प्रति तुकडी प्रमाणे शासनाच्या आदेशाप्रमाणे द्यावी लागेल.

१२) अ.वि.चालवताना ते सुरळीत चालावे म्हणून संबंधित जिल्हयाचे प्राचार्य, डाएट, विभागीय शिक्षण उपसंचालक, संचालक, म.रा.शै.सं.प्र.प. यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेऊन कार्यवाही केली जाईल.

हमीपत्राचा सोबत दिलेल्या नमुन्यात रू.१००/- च्या स्टॅम्पवर लेखी हमीपत्र दिले जावे.

**अध्यापक विद्यालयाचा तपशील**

| संस्थेचे नाव | अध्यापक विद्यालयाचे नाव व ठिकाण (पत्ता) | माध्यम | प्रकार | प्रवेश क्षमता | मान्यतेचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | आयडियल कॉलेज ऑफ एज्युकेशन वासरभगाव रोड मा. अंबरनाथ जि. ठाणे. | मराठी | - | 50 | 06-07 |
| | | इंग्रजी | - | 50 | 06-07 |

(स्वाक्षरी)
संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे ३० करिता.

प्रत :

१) मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सादर.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई--- विभाग --मुंबई---- यांना कार्यवाहीसाठी.

३) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, --जव्हार जि.ठाणे-- यांना पुढील कार्यवाहीसाठी.

४) संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे १.

५) शिक्षण निरीक्षक